# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १५/१२/२०१८ रोजी (का.प.क्र.१७) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक १५/१२/२०१८ रोजी (का.प.क्र.१७) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:३५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त,श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०४. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०५. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०६. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
०७. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
०८. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
०९. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१०. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

मा.सभापती : कचरा विल्हेवाट लावणे व प्रोसेसिंग करणे या सदंर्भात संबंधीत एजन्सीचे प्रतिनिधी यांनी सभागृहात पावर पॉइज प्रजेंटेशन नुसार माहिती द्यावी.
(यावेळी सभागृहात संबंधीत एजन्सीने कचऱ्याची विल्हेवाट लावणे व प्रोसेसिंग करणे संदर्भात सभागृहात पावर पॉईंट प्रेजेंटेशन नुसार माहिती दिली.)

श्री.गजानन बारवाल : या तीन एजन्सीने पाच महिने काम केले.जे प्रेजेंटेशन देण्यात आले आहे या सर्व एजन्सीचा लेखा-जोखा घेतला का? श्री.भोंबे यांनी यांच्याकडुन काय माहिती घेतली आहे?

घनकचरा कक्ष प्रमुख : १४ जुनला या एजन्सीला पाच महिन्यासाठी काम देण्यात आले होते.

मा.सभापती : प्रशासन म्हणुन तुम्ही यांचा काही फिडबॅक घेतला आहे का?

कक्ष प्रमुख(घनकचरा) : कोणकोणत्या वार्डमध्ये काम केले त्याचा रिपोर्ट बनवले आहे. किती लोक काम करतात, कोणकोणत्या वार्डामध्ये काम केले, कोणत्या वार्डामध्ये काम सुरु आहे आणि त्याचे आऊटपुट काय आहे. हे पाहण्यात आले आहे.

श्री.गजानन बारवाल :किती वेळा सुचना दिल्या, काय काय पत्र व्यवहार केला आहे. याचा खुलासा द्यावा.

कक्ष प्रमुख(घनकचरा) : नॉलेजलिंग जी संस्था आहे त्यांनी झोन नं.३,५,७ मधील जवळ पास वार्डातले कामे केली आहेत आणि काही कामे बाकी आहेत.

मा.सभापती : कचऱ्या पासुन मुक्तता मिळावी म्हणुन मा.आयुक्तांनी या एजन्सी आणल्या होत्या. माझ्या वार्डामध्ये फक्त एक दिवस हे लोक आले होते. या एजन्सीचे काम बघण्याची जबाबदारी प्रशासनाची होती.

कक्ष प्रमुख(घनकचरा) : झोन वाईज पुर्ण माहिती दोन दिवसात सादर करण्यात येईल.

मा.सभापती : यांनी केलेल्या कामावर प्रशासनाने क्रॉस चेकीग करायला पाहिजे होते.

श्री.गजानन बारवाल : जे काम एजन्सीने केले आहे त्यावर प्रशासन समाधानी आहात का?

कक्ष प्रमुख(घनकचरा) : नॉलेजलिंग या संस्थेने झोन क्र.३ मध्ये चांगले काम केले आहे. झोन क्र.५ आणि ७ मध्ये बऱ्यापैकी काम झाले आहे.

श्री.गजानन बारवाल : या तीन्ही एजन्सीने ज्या ज्या ठिकाणी काम केले आहे त्यावर तुम्ही समाधानी आहात का? याचा खुलासा करावा.

श्रीमती.सायरा बानो : या तीन्ही एजन्सीने झोन क्र.२ चा उल्लेख केलेला नाही.

मा.सभापती : सदस्यांचे म्हणणे आहे की, प्रशासनाचे प्रमुख म्हणुन या एजन्सीने जे काम केले आहे त्यावर समाधानी आहेत की नाही ते सांगावे.

कक्ष प्रमुख(घनकचरा) : झोन नं.८,९ मधील वैयक्तीक रिपोर्ट मा.आयुक्तांना दिली आहे. यांच्या कामाबद्दल घनकचरा विभाग प्रमुख म्हणुन मी समाधानी नाही. आणि त्यांना एक्सटेशन देणे योग्य नाही. त्यांनी झोन नं.२ मध्ये फक्त वार्ड क्र.६८ मध्येच काम केले आहे, झोन नं.१ मध्ये वार्ड क्र.१९ मध्ये काम केले आहे आणि झोन नं.४ मध्ये वार्ड क्र.२८ मध्येच काम केले आहे.

श्री.अब्दुल मं.नविद : राहुलनगर मध्ये एक स्मशान भुमी आहे तिथे पुर्ण कचरा डंम्प केला जात आहे. कचऱ्याला आग लागली होती तिथे फायर ब्रिगेड गाडी बोलवण्यात आले होती.

श्री.गजानन बारवाल : प्रेजेंटेशन बद्दल कोणत्याही प्रकारचे दूमत नाही. परंतु प्रशासन त्यांच्याशी संतुष्ठ नाही त्यामुळे याच्या नंतरचा निर्णय प्रशासनानेच घ्यावा.

मा.सभापती : तीन्ही एजन्सीच्या प्रेजेंटेशनच्या बाबतीत सदस्यांच्या भावना जाणुन घेऊन काय केले पाहिजे याची यादी त्यांनी प्रेजेंटेशन मध्ये दिली आहे. त्यातली कुठली कामे झाली आहेत याच्या बद्दल सभागृह समाधानी नाही. जे कामे झाली आहेत ते फक्त संदेश देण्यापुरती करण्यात आली आहे. या तीन्ही एजन्सीचे गुणांकन करणे आवश्यक आहे. प्रशासनाचे प्रमुख म्हणुन तीन्ही एजन्सीच्या कामाचे स्वतः पुनर मुल्यांकन करा. त्यांनी केलेल्या कामाचे फिड बॅक घ्यावे. केलेल्या कामाचे ठिकाणाची प्रत्येक्ष पाहणी करा त्या नंतर विचार करुन मा.आयुक्तांसमोर अहवाल सादर करावा. मा.आयुक्त जो निर्णय घेतील तो स्थायी समितीमध्ये येईल त्यावर ही समिती विचार करील.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : मागच्या काही बैठकीपासुन मी पार्किंगच्या संदर्भात बोलले होते. मा.न्यायालयाने शहरातील पार्किंगच्या जागा मोकळ्या करण्याचे आदेश दिले होते. महापालिकेने ४७ पार्किंगच्या जागेची यादी सादर केली होती. त्या पैकी एकही पार्किंग आता पर्यंत निघालेली नाही. वृत्तपत्रामध्ये आले आहे की, सहा आठवड्यामध्ये पार्किंगचे धोरण ठरवा असे मा.कोर्टाचे आदेश आहे.या आदेशाचे पालन केले जाणार आहे का?याचा खुलासा करावा.

मा.सभापती : ए.बी.देशमुख हे मा.आयुक्तांबरोबर मुंबईला गेले आहेत. एस.एस.कुलकर्णी यांनी खुलासा करावा.

उपअभियंता(न.र) : याची पुर्ण माहिती उपलब्ध नाही. मा.न्यायालयाच्या धोरणानुसार नगररचना विभागा मार्फत धोरण निश्चित करुन कार्यवाही करण्यात येईल.

अति.आयुक्त : मा.आयुक्तांनी याबाबतीत समिती स्थापन केलेली आहे. नगररचना, मालमत्ता आणि बांधकाम विभाग या सगळ्या प्रतिनिधींचा समावेश आहे. लवकरात लवकर अहवाल तयार करुन पार्किंगचे धोरण निश्चित करणार आहोत.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : धोरण निश्चित करत असतांना स्वच्छतागृहाचा समावेश करावा. आणि डस्टबीन्सच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे.

मा.सभापती : शहरासाठी एकत्रित डस्टबीन्स खरेदी करत आहोत. त्याचे धोरण निश्चित झालेले आहे.

श्री.गजानन बारवाल : लेखा विभागाबद्दल ज्या सुचना दिल्या होत्या त्या सुचनेचा पालन करण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला आहे.

मा.सभापती : यामध्ये मा.आयुक्तांचे आभार मानावे लागेल. श्री.केंद्रे यांचे अधिकार काढुन टाकले आहे. त्यांनी तो चार्ज श्री.पाटणी यांच्याकडे दिला आहे. श्री.संजय पवार यांच्याकडे जमाव बाजु बघण्याचे काम दिले आहे. उर्वरित कामे श्री.पाटणी हे बघणार आहे.

श्री.गजानन बारवाल : जे चौकशीचे आदेश दिले होते त्या बाबतीत कार्यवाही करणार आहेत की नाही?

अति.आयुक्त : चौकशीसाठी स्वतः मुख्यलेखाधिकारी यांना सांगितले आहे.

मा.सभापती : २ दिवसाच्या आत चौकशी करावी.काय कार्यवाही केली ती स्थायी समितीला कळवावी.

श्रीमत.शेख नसरीन : वार्डामधील हॉलचा प्रश्न सोडवण्यात येत नाही.

मा.सभापती : दोन महिन्यापासुन हा विषय चालु आहे. यावर निर्णय का घेत नाही.

मालमत्ता अधिकारी : यावर हेरिंग घेण्याची सांगितले आहे. या आठवड्यात हेरिंग होईल.

मा.सभापती : हेरिंग कशाची घ्यायची आहे. लवकरात लवकर कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.अब्दुल मं.नविद : मालमत्ता विभागाकडुन शहरामध्ये किती स्मशान भुमि आणि किती कब्रस्तान आहे याची माहिती मागितली होती. स्मशान भुमि आणि कब्रस्तानमध्ये जे कर्मचारी काम करतात त्यांना कुठलेही प्रकारचे मानधन दिले जात नाही. सर्वसाधारण सभेमध्ये याचा ठराव झालेला असुन सुध्दा अमलबजावणी होत नाही.

अति.आयुक्त : संचिका आरोग्य विभागात पाठवलेली आहे. त्याच्या संबंधीत विषय आहे.

मा.सभापती : स्मशान भुमि आणि कब्रस्तानच्या ठिकाणी जे कर्मचारी काम करतात त्यांना मानधन देण्याच्या संदर्भाने सर्वसाधारण सभेमध्ये ठराव होऊन चार महिने झाले आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वैद्यकीय अधि. : प्रथमच संचिका आलेली आहे यापूर्वी कोणतेही कार्यवाही विभागातुन झालेली नाही.

मा.सभापती : बैठक संपल्यावर श्रीमती.पाडळकर मॅडम आणि श्रीमती.मुथा मॅडम यांनी एकत्रीत बसून आजच्या आज निर्णय घ्यावा.

श्री.गजानन बारवाल : पंतप्रधान आवास योजने बाबत सध्या परिस्थिती काय आहे?

कार्यकारी अभियंता : प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सन २०१६-१७ मध्ये ऑनलाईन अर्ज मांगविले होते. एकुण ८०,५१८ फार्म रजिस्टर नोंदणी झालेली आहे. यामध्ये चार घटकामध्ये विभागणी केलेली आहे. दोन घटकामध्ये अमलबजावणी करत आहोत. घटक क्र.३ एचपी आणि घटक क्र.४ बीएच आहे. बीएलसी च्या अंतर्गत सुमारे पाच हजार चे दोन डीपीआर शासनाकडे मंजुरीसाठी पाठवले होते परंतु शासनाने ते रिजेक्ट केले आहे. यामध्ये काही बहुतांश लाभार्थ्यांकडे २०x३० चे बॉन्डं आहे. त्या बॉन्डंच्या आधारे नगररचना विभागामधुन ज्यांना परवानगी मिळत नाही आणि पंतप्रधान आवास योजनेचा जो शासन निर्णय आहे तो नगररचना विभागाकडुन परवानगी घेणे बंधनकारक आहे. ज्या लाभार्थ्यांकडे पुर्ण पणे रजिस्टरी केलेली आहे असे ६३१ अर्ज शॉर्टआऊट केले आहे आणि ६३१ अर्जाचा डिपीआर करुन शासनाकडे पाठवलेला आहे. हे घटक क्र.४ मध्ये काम करत आहोत. आणि घटक क्र.३ मध्ये ५२ हजार अर्जदार आलेले आहे.

श्री.गजानन बारवाल : माझ्या वार्डातील लोकांनी फार्म भरलेले आहेत त्यांना कुठल्याही प्रकारची माहिती मिळत नाही. विषेश बाब म्हणुन यामध्ये गांभियांने लक्ष देण्याचे आदेश देण्यात यावे.

मा.सभापती : यामध्ये पुर्ण गरीब लोकांनी अर्ज केलेले आहे. ज्यांचे मंजुर झाले आहे त्याची स्वतंत्र यादी आणि ज्यांची मंजुर होत नाही त्याची एक यादी करा. तिसरी यादी मध्ये जे मंजुर होत नाही त्याची काय पुर्तता करणे शक्य आहे तशी यादी करावी. शासनाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. नगररचना विभागाला सुचना देण्यात येते की, यामध्ये आलेले २०x३० जेवढे काही अर्ज आहे त्याची यादी करुन सर्वसाधारण सभेमध्ये ठेवावी. यामध्ये सर्वसाधारण सभा सकारात्मक निर्णय घेईल.सर्वसाधारण सभेचा ठराव पुन्हा शासनाकडे पाठवा.शासनाची विशेष बाब म्हणुन मंजुरी घेता येईल का याबाबत प्रयत्न करावे.

श्रीमती.राखी देसरडा : सिल्लेखाना येथील होर्डिंग्स बाबत मागच्या बैठकीत आदेशित केले होते.

मा.सभापती : सिल्लेखानाच्या बाबतीत लिगल परवानगी दिलेली आहे असे सांगण्यात आले होते. त्याची कॉफी पाठवण्यात का आली नाही?

श्रीमती.राखी देसरडा : आम्ही जो अहवाल मागतो तो आम्हाला दिला का जात नाही? रस्त्यावरील दुभाजकाला दिलेली निविदा त्यावर सुध्दा अहवाल मांगितला होता त्याचे काय झाले? मनपाच्या निधीतुन कॉक्रीट रोडचे बिल येणाऱ्या कामाची यादीचे काय झाले?

मा.सभापती : कॉक्रीट रोडच्या संदर्भाने लेखा विभागामध्ये जे देयक आले असतील आणि जे दिलेली आहे त्याची यादी देण्यात यावी.

श्रीमती राखी देसरडा :समांतर कंपनीकडून मनपाला हस्तांतर झालेल्या पाईपचा हिशोब बाबत खुलासा द्यावा.

मा.सभापती : याची पुर्ण माहिती मा.आयुक्तांनी पुढच्या बैठकी मध्ये खुलासा द्यावा.

श्री.अब्दुल मं.नविद : १९.११.२०१८ ला अकाऊंट विभागामध्ये एक पत्र दिले होते की, सविस्तर माहिती द्या.

मा.सभापती : श्री.पाटणी, काही महिन्यापासुन सदस्य माहिती मागत आहेत त्यांना ती माहिती मिळत नाही. तातडीने यांना ती माहिती मिळेल अशी कार्यवाही आजच्या आज करावी.

श्री.गजानन बारवाल : वृत्तपत्रामध्ये बातमी आहे की, मनपामध्ये मोठी भरती होणार आहे. कोण कोणती पदे व कशाप्रकारे भरती होणार, सध्या परिस्थिती काय आहे याचा खुलासा करावा.

मा.सभापती : श्रीमती मुथ्था मॅडम याबाबत खुलासा करावा.

उपआयुक्त(महसुल) : भरती संदर्भात सप्टेंबर ते ऑक्टोबर महिन्यामध्ये फक्त ओएमआर मशीन्स पुरवणे आणि निकाल जाहीर करणे यासाठी निविदा काढण्यात आली होती. त्यानुसार एलवन फायनल झालेले आहे. कुठल्या कुठल्या संवर्गातील पदांची भरती करायची आहे त्या संदर्भातील संचिका मा.आयुक्तांकडे सादर केली आहे. सर्व रिक्त पदांची माहिती सादर केलेली आहे.

**<u>विषय क्र. १४७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बारापुल्ला या ऐतिहासिक दरवाजाचे संवर्धन करणे या कामाचे अंदाजपत्रक INTACH या संस्थेने तयार करून सादर केलेले आहे. औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असून या शहरात पश्चिम बाजूस खाम नदीच्या तिरावर/काठावर या दरवाजाचे बांधकाम करण्यात आले आहे. या दरवाजातून खाम नदीवरील पुलावरून छावणीकडे जाणारा रस्ता आहे. या पुलास बारा कमाणी आहेत त्यावरून याला बारापुल्ला दरवाजा असे नांव पडले. या पुलावरून शत्रुवर देखरेख व टेहाळणी केली जात असे हि वास्तु मुगल वास्तु कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. करीता अशा वास्तुचे संवर्धन करणे आवश्यक आहे. सदर अंदाजपत्रकास आर्थिक तरतुद उपलब्ध असून दि.१७/११/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तावित कामाचा समावेश सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ हेरीटेज वास्तु संवर्धन या लेखाशिर्ष मध्ये करण्यात आली आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रू.४७,३५,४०३/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.१४७,१४८,१४९ मंजुर करण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बारापुल्ला या ऐतिहासिक दरवाजाचे संवर्धन करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.४७,३५,४०३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १४८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कटकट गेट इस्लाम दरवाजा या ऐतिहासिक वास्तुंचे संवर्धन करणे या कामाचे अंदाजपत्रक INTACH या संस्थेने तयार करून सादर केलेले आहे. कटकट गेट औरंगाबाद शहराच्या पूर्वेस असून पुर्व बाजुच्या शत्रुवर नजर ठेवण्यासाठी सदर गेटचे बांधकाम करण्यात आले होते. सदर दरवाजा हा मुगल कालीन वास्तु कलेचा अविष्कार आहे. या दरवाजास भक्कम असा लाकडी दरवाजा होता, दरवाज्याच्या दोन्ही बाजूस शहराची संरक्षित भिंत आहे. अशा ऐतिहासिक वारसा संपन्न वास्तुचे संवर्धन केल्यास एक आकर्षक पर्यटन स्थळ निर्माण होऊन वास्तुकलेचा इतिहास पुढील पिढीस प्रेरणादायी ठरेल, यासाठी या दरवाज्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे. सदर अंदाजपत्रकास आर्थिक तरतुद उपलब्ध असून दि.२२/११/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तावित कामाचा समावेश सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च-अ हेरीटेज वास्तु संवर्धन या लेखाशिर्ष मध्ये करण्यात आली आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रू.४३,६३,२४५/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कटकट गेट इस्लाम दरवाजा या ऐतिहासिक वास्तुंचे संवर्धन करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.४३,६३,२४५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १४९ :</u>**

विषय : वार्ड क्र.९८ खिंवसरा पार्क येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे, या कामाचे ठेकेदार मे.श्रीकांत सुरेश बिक्कड यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.२८ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९,००,६९९.००/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.२०१८-AMCA-282647-६ सन २०१८-२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-१ |
| २ | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.९८ खिंवसरा पार्क येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती मान्यता ठराव क्र.२५७ दिनांक २७/०७/१८ र.रू.२९,९९,०६८/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.२९,९९,०६८/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई-टेंडर |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २६/०७/२०१८ ते ०९/०३/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १३/०३/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एक |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.श्रीकांत सुरेश बिक्कड | २९,९९,०६८.०० | अं.प.दरापेक्षा ०.९० टक्के कमी |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | ले-आऊट न्यु वर्क (कॉंक्रीट रस्ते) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |

तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार मे.श्री.श्रीकांत सुरेश बिक्कड यांनी ०.००९ टक्के कमी दराने निविदा दाखल केली होती. वाटाघाटीअंती कंत्राटदार यांनी ३.२८ टक्के कमी दराने काम करण्यास सहमती दिली आहे. अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.२८ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९,००,६९९.००/- पर्यंत काम करून घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९८ खिंवसरा पार्क येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार मे.श्रीकांत सुरेश बिक्कड यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.२८ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२९,००,६९९.००/- पर्यंत करून घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्र. १५० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८३ देवगिरी कॉलनी येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक एसएसआर-२०१७-१८ नुसार रक्कम रू.२५,२६,५६८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षक मधुन प्रस्तावित करण्यात आला आहे.

करीता अंदाजपत्रक र.रू.२५,२६,५६८/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : ऐनवेळीचे विषय क्र.१५० ते १५७ मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८३ देवगिरी कॉलनी येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.२५,२६,५६८/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०९ अंतर्गत शॉपींग कॉम्प्लेक्स ते हडको कॉर्नर रोड (नवजीवन कॉलनी कमान (पाणपोई) पर्यंत) सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३९,८९,८००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची २०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१८-१९ मधील नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३९,८९,८००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०९ अंतर्गत शॉपींग कॉम्प्लेक्स ते हडको कॉर्नर रोड (नवजीवन कॉलनी कमान (पाणपोई) पर्यंत) सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.३९,८९,८००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१४ पडेगाव येथील माजी सैनिक कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे सन २०१५-१६ च्या एसएसआर- दरसुचीनुसार र.रू.२९,८६,२६५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली काम जलनिःसारण अंतर्गत सन २०१८-१९ या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.२९,८६,२६५/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१४ पडेगाव येथील माजी सैनिक कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.२९,८६,२६५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१०६ कांचनवाडी महानगरपालिका शाळेची इमारत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन २०१५-२०१६ नुसार रक्कम रू.४१,४५,४५०/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.०९/१०/२०१८ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प २०१७-२०१८ मधील लेखाशिर्ष विकास इमारती शाळा व दवाखाने पृष्ठ क्र.जीबीआर-वॉर्ड -८-पान नं.६५ अ.क्र.०१ वर तरतुद उपलब्ध आहे. तरी सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.४१,४५,४५०/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१०६ कांचनवाडी महानगरपालिका शाळेची इमारत बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.४१,४५,४५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३८ अंतर्गत सिडको एन/१ भागातील सेक्टर एफ मधील रस्त्याचे ट्रिमिक्स काँक्रीटीकरण करणे, अं.प. रक्कम रू.२४,९९,९००/- हे काम रितसर आवश्यक मंजुरी/मान्यता घेऊन कार्यादेश जा.क्र./मनपा/वार्ड अभि-०५/०२/२०१७ दि.०८/०८/२०१७ अन्वये गुत्तेदार श्री.शेख शहानवाज शेख नवाब यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५ टक्के कमी दराने करून घेण्यात येत आहे. सदरील कामाचे मुळ अंदाजपत्रक उपलब्ध आर्थिक तरतुदीच्या मर्यादेपर्यंत करण्यात आले होते. परंतु या कामाअंतर्गत काँक्रीट पेव्हमेंटचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्याची पातळी लगतच्या फुटपाथपेक्षा उंच झाल्यामुळे नागरीकांना रहदारीस अत्यंत त्रास होत आहे. त्यामुळे लगतचा फुटपाथ रस्त्यांच्या पातळीत करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. लगतचा फुटपाथ रस्त्याच्या पातळीमध्ये करण्याकरीता जुने पेव्हरब्लॉक काढून परत योग्य पातळीत बसविणे आवश्यक ठिकाणी नवीन ६० एमएम जाडीचे पेव्हरब्लॉक बसविणे, पेव्हर ब्लॉकच्या बाजूला काँक्रीटींग करणे इत्यादी र.रू.४,६९,५६९/- च्या अतिरिक्त बाबीसह सुधारीत अंदाजपत्रक र.रू.३१,७०,७४०/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी रक्कम रू.४,६९,५६९/- च्या अतिरिक्त बाबींसह सुधारीत अंदाजपत्रक र.रू.३१,७०,७४०/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३८ अंतर्गत सिडको एन/१ भागातील सेक्टर एफ मधील रस्त्याचे ट्रिमिक्स काँक्रीटीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या अतिरिक्त बाबींसह सुधारीत र.रू.३१,७०,७४०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जालनारोड येथील अमरप्रित चौकातील वाहतुक बेटामध्ये मा.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे शिल्प (म्युरल) तयार करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची सन २०१८-१९ नुसार आणि दरसुचीत समाविष्ट नसलेल्या बाबीसाठी बाजारभावातील दरपत्रकानुसार रक्कम रू.३२,७१,८३९/- चे तयार करण्यात आले असून प्रस्तावित अंदाजपत्रकात चौथाऱ्याचे बांधकाम करणे, म्युरल बसविणे, फाऊंटन बसविणे, स्टेनलेस स्टील रेलींग बसविणे इत्यादी बाबींचा समावेश आहे.

प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील भांडवली कामे पृष्ठ क्र. पी.नं. ६१ अ.क्र.१५ वरील पुतळे संगोपन व खरेदी या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध तरतुदी मधुन करण्यात येणार आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करून प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर करणेची शिफारस करण्यात येत आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.३२,७१,८३९/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालनारोड येथील अमरप्रित चौकातील वाहतुक बेटामध्ये मा.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे शिल्प (म्युरल) तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.३२,७१,८३९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत एकनाथ रंगमंदिर येथील विद्युतीकरण व्यवस्था करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक वास्तु विशारद श्री.प्रदिप देशपांडे, डी.पी. डीझाईन असोसिएट, औरंगाबाद यांनी सार्वजनिक बांधकाम (विद्युत) यांचे सन २०१८-१९ च्या दरसुचीनुसार आणि ज्या बाबी दरसुचीमध्ये समाविष्ठ नाहीत त्या बाजारभावानुसार विचारात घेवून एकूण रक्कम रू.४९,९९,३५०/- चे अंदाजपत्रक तयार केले आहे. या कामासाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतणीकरण करणे या शिर्षकाखाली पुरेशी तरतुद उपलब्ध नसल्यामुळे लेखा विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ नुसार पुर्नविनियोजीत अर्थसंकल्पात या कामासाठी वाढीव तरतुद उपलब्ध होणेसह अंदाजपत्रक रक्कम रू.४९,९९,३५०/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव तसेच सदर काम अतितातडीने हाती घ्यावयाचे असल्यामुळे आणि या कामा अभावी नुतणीकरणासंबंधीत इतर कामे देखील लांबणीवर जात असल्यामुळे या कामासाठी अल्प मुदतीच्या निविदा मागवणे बाबत मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदिर येथील विद्युतीकरण व्यवस्था करण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.४९,९९,३५०/- चे अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. तसेच या कामासाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतणीकरण करणे या शिर्षकाखाली पुरेशी तरतुद उपलब्ध नसल्यामुळे लेखा विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ नुसार पुर्नविनियोजीत अर्थसंकल्पात या कामासाठी वाढीव तरतुद उपलब्ध होणेस तसेच या कामासाठी अल्प मुदतीच्या निविदा मागवणेसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७ :**

विषय : वार्ड क्र.११४ अंतर्गत नाईकनगर ते विनायकनगर या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे या कामाचे ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.३७ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.१,३७,९०,८२४/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-AMCA-258373-१ सन २०१७-२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-२ महानगरपालिका औरंगाबाद |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.११४ अंतर्गत नाईकनगर ते विनायकनगर या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | १,६९,११,८२०/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | १,६९,११,८२०/- |

| | | |
|---|---|---|
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग महानगरपालिका औरंगाबाद |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २८/११/२०१७ ते २६/१२/२०१७ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २८/०३/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | चार |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | १३७९०८२४.४० | १४.३७ टक्के कमी दराने |
| ०२. | सहारा कन्स्ट्रक्शन | १३९४३४६८.१२ | १३.४२ टक्के कमी दराने |
| ०३. | एम.ए.सिद्दीकी | १४९०८९६७.४२ | ७.४३ टक्के कमी दराने |
| ०४. | एल.के.कन्स्ट्रक्शन | १५१४०५१२.८० | ५.९९ टक्के कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | विविध विकास कामे व मुलभुत सुविधा पुरविणे सातारा/देवळाई |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |

तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.३७ टक्के कमी दर म्हणजेच टेंडर र.रू.१,३७,९०,८२४/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.११४ अंतर्गत नाईकनगर ते विनायकनगर या रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.३७ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.१,३७,९०,८२४/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद